"सज्जनगड" डिसे.२००९ च्या अंकातून - साभार

# थोर राष्ट्रगुरु श्री समर्थ

आचार्य प्र. के. अत्रे.

*पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत आचार्य अत्रे यांनी दि. १६ मे १९६९ रोजी केलेले भाषण.*

या वसंत व्याखयान मालेच्या व्यासपीठावरून माझी बरीच म्हणजे निदान पंधरावीस तरी व्याख्याने झाली असतील. वसंत व्याख्यानमाला ही पुणे शहराच्या सांस्कृतिक व राजकीय जीवनाची एक शक्ती आहे. याच ठिकाणी आम्ही बोलायला शिकलो व वक्ते झालो.

वयाच्या बाराव्या वर्षापासून मी या व्याख्यान मालेतील व्याख्याने ऐकत आहे. आमचे भाग्य फार मोठे. आम्ही अशा एका कालखंडात लहानाचे मोठे झालो, की ज्यावेळी या पुण्यात फार मोठमोठी माणसे वावरत होती. भारतातील डॉ. ॲनी बेझंट, पं. मदन मोहन मालवीय, सत्यमूर्ती असे मोठे मोठे वक्ते व विद्वान येत असत व त्यांची व्याख्याने येथे होत असत. या मोठमोठ्या विद्वानांची भाषणे ऐकून आपणही मोठे वक्ते व्हावे असे आम्हाला मनापासून वाटे. व्याख्यान हे केवळ कानाचाच उपयोग करून नव्हे तर मनाचा उपयोग करून ऐकावयाचे असते. या काळात वक्त्याप्रमाणे उपवक्तेही नामांकित असत आणि या ठिकाणी वक्त्यांच्या ज्ञानाची खरी कसोटी लागत असे.

अनेक मोठमोठ्या वक्त्यांची कसोटी पुण्याच्या या वसंत व्याख्यानमालेत लागली आहे. या ठिकाणी जो एकदा मान्य झाला तो महाराष्ट्रात कोठेही मोठा वक्ता म्हणून मान्यता पावत असे. असा या मालेचा लौकिक आहे.

मोठ्या लोकांनाही वाईट दिवस येतात तसे आता झाले आहे. त्यात छत्रपती शिवाजी महाराज व समर्थ रामदास सापडले. त्यातल्या त्यात शिवाजी महाराजांना आता बरे दिवस आले आहेत असे मी नुकतेच शिवाजी पार्कवरील सभेत सांगितले. मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री बाळासाहेब खेर. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो. हे खेर शिवाजी महाराजांना राष्ट्रपुरुष किंवा युगपुरुष म्हणण्यास तयार नव्हते. त्यांच्या जयंतीची सरकारी सुट्टी देणे त्यांना मंजूर नव्हते... काय म्हणावे त्यांना. तसेच पं. नेहरूंनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा मोठा ग्रंथ लिहिला. पण 'नेहरू डिस्कव्हर्ड इंडिया बट नेव्हर फाऊंड महाराष्ट्र'. हे पं. नेहरू महाराजांना उपटसुंभ म्हणत तर म. गांधी त्यांना वाट चुकलेला देशभक्त म्हणत. गांधी काय किंवा नेहरू काय, त्यांना शिवाजी महाराज कसे होते हे केव्हाच समजले नाही. याचे कारण दोघे राजकारणी देशभक्त इंग्रजांच्या चष्म्यातून शिवाजी महाराजांचे चरित्र पहात होते. त्यांनी स्वत:ची राष्ट्रीय दृष्टी वापरली असती तर तुम्हाआम्हाप्रमाणे त्यांनाही शिवाजी महाराज वंदनीय राष्ट्रपुरुषच वाटले असते. शिवाजी महाराजांनी अफझलखानास मारले हा जगाच्या इतिहासातील एक अभूतपूर्व चमत्कार त्यांनी घडवून आणला.

महाभारतातील थोर व्यक्तींनाही असेच वाईट दिवस आले आहेत. पुराणकालीन व इतिहासकालीन थोर प्रतिष्ठित व्यक्तींचे चारित्र्यहनन करायची, अशी लाटच या महाराष्ट्रात सध्या निर्माण झाली आहे. मराठीत नामवंत ठरलेल्या काही लेखक लेखकांनी मोठ्या विभूतींचे चारित्र्यहनन करण्याचा

धंदाच जणू पत्करला आहे. या लाटेत श्री समर्थ रामदास स्वामी सापडले आहेत. जो उठतो तो सध्या रामदासांच्या मागे लागतो. अशा प्रकारचे लिखाण करणारे काही लोक मूलत:च वाईट आहेत. पण काही सुशिक्षित व विचारवंतही असेच लिहू लागले आहेत. याचा मला फार खेद होतो आणि रागही येतो.

ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम हा केवढा वारसा महाराष्ट्राला लाभला आहे. सध्या महाराष्ट्रात हयात असलेले सर्वश्रेष्ठ ज्ञानी पुरुष आचार्य विनोबा भावे हे श्री समर्थांचे परम भक्त आहेत. 'समर्थ शिकवणीमुळे मी राजकारणात आलो' असे आचार्य विनोबा भावे सांगतात.

आचार्य विनोबा भावे यांनी लिहिलेले, 'समर्थस्मरण' वाचा एकदा. या ग्रंथात आचार्यांनी समर्थांबद्दल केलेले सुंदर विवेचन अप्रतिम आहे.

येथे संपूर्ण समर्थ चरित्र सांगण्याचे प्रयोजन नाही- परंतु त्यांनी प्रथम १२ वर्षे रामनामाचे पुरश्चरण करून आत्मिक सामर्थ्य संपादन केले. त्यानंतर १२ वर्षे सबंध हिंदुस्थानभर पायी भ्रमण करून संपूर्ण देशाची परिस्थिती अवलोकन केली. ही काय लहानसहान कामगिरी आहे काय ? आज आम्हाला येथून भांबुर्ड्यापर्यंत चालत जाता येत नाही. त्या काळात ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, रामदास यांनी पदयात्रा करून हिमालय ते कन्याकुमारीपर्यंत अखिल देशाचे सावध चित्ताने निरीक्षण केले. सर्वच संत परमार्थमार्गाचे होते. परंतु रामदासांनी प्रपंच सांभाळून परमार्थ कसा साधावा याची शिकवण दिली.

रामदासांनी आपणाला नवी दृष्टी दिली, असे विनोबा म्हणतात, ते खरे आहे. मानवाच्या प्रत्येक हालचाली तो स्वत: करीत नाही. रामदासांना या कर्मणी प्रयोगाचा कर्तरी प्रयोग करावयाचा होता. म्हणून त्यांनी विवेक आणि वैराग्य या दोन गोष्टी सांगितल्या. 'देहगेहाचा स्नेह तोडावा' तरच परमेश्वर प्राप्त होतो असा समर्थांचा संदेश विनोबा सांगतात.

समर्थांनी देशाची परिस्थिती प्रत्यक्ष पहाण्यासाठी बारा वर्षे आसेतु हिमाचल सबंध भारतभर पायी प्रवास केला. त्यात त्यांना देशातील देवळे व समाज भ्रष्ट झालेला दिसला. स्त्रियांचे हाल पहावत ना. परधर्मीय राज्यामुळे देशबांधव असह्य झाले होते. तेव्हा त्यांनी विचार केला. त्यात त्यांना आणखी एका तत्त्वाचा साक्षात्कार झाला. ते म्हणजे व्यक्ती आणि परमार्थ यामध्ये समाजपुरुष उभा आहे आणि म्हणूनच समर्थ समाजसन्मुख झाले. संसार आणि प्रपंच यात फरक आहे. संसार म्हणजे स्वकुटुंब चालविणे. परंतु तेवढ्याने भागत नाही. तरी प्रपंच करावा नेटका असे त्यांनी सांगितले. याचा अर्थ आपल्या भोवतालचा समाज आहे, त्या समाजासंबंधीची प्रत्येकाची काही कर्तव्ये असतात. ती प्रत्येकाने पार पाडली तरच परमार्थ साधतो. प्रपंच करावा नेटका म्हणजे समाजपरिस्थिती लक्षात घेऊन सावधान चित्ताने वागावे. नीती याचा अर्थ तोच आहे. जो सावध चित्ताने जागरूकपणे वागतो, तोच नीतिमान. त्याचेच हातून प्रपंच नेटका होतो.

राज्यव्यवस्था चालविण्यासाठी ठिकठिकाणी पोलीस चौक्या आवश्यक असतात. त्याच पद्धतीने समर्थांनी समाज जागृत करून संघटित करण्यासाठी सर्वत्र मठस्थापना केली. सबंध भारतात अशा प्रकारे त्यांनी अकराशे मठ प्रस्थापित केले होते. त्या प्रत्येक मठासाठी एकेक जाणता महंत कर्ताकरविता, निर्माण केला. त्या महंतावर रामोपासना करून समाजजागृतीचे व समाज योग्य मार्गावर ठेवण्याचे काम सोपविले होते. समर्थांचे व त्यांच्या महंतांचे उपास्य दैवत धनुर्धारी राम हे होते. ज्या रामाने रावणाचा वध केला तो राम त्यांचे दैवत होते. म. गांधींचा राम नव्हे ! शस्त्र आणि बल यांच्या

दुहेरी उपासनेचा मंत्र रामदासांनी शिकविला आणि शेकडो महंतांच्याद्वारा त्यांनी राष्ट्राची संघटना उभी केली.

ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम हे मोठेच संतपुरुष होऊन गेले. परंतु त्यांनी समर्थांप्रमाणे समाजाची अशी संघटना बनविल्याचा दाखला नाही. समर्थांना हा देश व हा समाज परकीय आक्रमणापासून बचावण्यासाठी देशसंरक्षणाची संघटना उभारून मार्गदर्शन करावयाचे होते. म्हणून त्यांनी ही मठ व महंत पद्धती स्वीकारली. या महंतांनी केवळ जगण्यापुरती भिक्षा मागून अहोरात्र प्रचार कार्य करायचे, समाजाचे निरीक्षण करावयाचे अशी कामगिरी त्यांच्यावर सोपविली होती.

समर्थांनी असे देशव्यापक कार्य केले असताही आमच्या दादांचे (म.म.पोतदारांचे) मित्र न. र. फाटक मात्र रामदास आणि शिवाजी यांची भेट राज्याभिषेकापूर्वी झालीच नाही असा हट्ट धरून बसले आहेत. रामदासांनी फाटकांचे काय घोडे मारले आहे ते कळत नाही. या फाटकांप्रमाणे प्रो. माटे यांनी असेच काहीतरी तर्कट रचून समर्थ आणि शिवाजी यांची भेटच झाली नाही, झाली असल्यास फार उशीरा झाली असे जाहीर केले.

देश स्वतंत्र करून हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याची मूळ कल्पना छत्रपतींचीच होती. रामदासांनी ती त्यांना शिकविली असे कोणीच म्हणत नाही. समर्थांनी त्यांना स्वराज्यस्थापनेस उद्युक्त केले, हे मला मान्य नाही. असे असले तरी स्वराज्यस्थापनेच्या कामात छत्रपतींना समर्थांचे फार मोठे सहाय्य झाले ही गोष्ट नाकारता येणार नाही.

समर्थ वयाच्या छत्तिसाव्या वर्षी महाराष्ट्रात परत आले. त्यावेळी छत्रपती एकोणीस वर्षांचे असून त्यांनी गड जिंकण्याचे काम सुरू केले होते. ते पाहून समर्थांना असे वाटले की, स्वराज्य स्थापन करण्यास हाच एक योग्य पुरुष आहे. तेव्हा स्वधर्मसंरक्षणासाठी आणि स्वराज्यस्थापनेसाठी शिवाजी महाराज जे कार्य करीत होते त्या कार्यात आपल्या परीने हातभार लावण्याचे व आवश्यक तेथे मार्गदर्शन करण्याचे कार्य समर्थांनी केले असा इतिहास आहे.

परंतु न. र. फाटक यांना हे मान्य नाही. त्यांच्या मते शिवाजी महाराज बेचाळीस वर्षांचे होते तेव्हा त्यांची समर्थांशी भेट झाली. म्हणून स्वराज्य स्थापनेच्या कार्यात रामदासांना काहीच स्थान नाही.

समर्थांनी लिहिलेला 'दासबोध' हा एकच ग्रंथ काळजीपूर्वक वाचला तर त्यावरून स्वराज्यस्थापनेस त्या ग्रंथातील वचनांचे सहाय्य निश्चित झाले होते असे दिसेल. आज जी आपण राजकारणात भाषा वापरतो तीच त्यावेळी समर्थांनी वापरली आहे. 'पहिले हरिकथा निरूपण' 'दुसरे ते राजकारण' या त्यांच्या ओवीतील राजकारण हा शब्द सध्याच्या राजकारण याच अर्थाने घ्यावयाचा आहे. पण फाटक म्हणतात, राजकारण म्हणजे 'चातुर्य'. चातुर्य या शब्दातूनही तोच अर्थ निघतो. राजकारण म्हणजे बलोपासना असाही राजकारणासमान अर्थ निघतो. दासबोधाच्या अठराव्या दशकातील सहावा समास काळजीपूर्वक वाचावा म्हणजे अफझुलखान-वधापूर्वीची व नंतरची परिस्थिती चित्रित केलेली दिसून येईल. नंतर पुढे एकोणिसाव्या समासात राजकारण या शब्दाचा अर्थ आपण आज ज्या अर्थाने करतो त्याच स्वरूपाचा आहे असे दिसते.

समर्थांना राजकारण व 'महाराष्ट्र धर्म' हे माहीत नव्हते हा त्यांच्यावरील आक्षेप साफ खोटा आहे. राजवाडे व धुळ्याचे देव यांनी याबाबत खूप लिहिले असून समर्थ हे राजकारणी संत होते हे सिद्ध केले आहे.

स्वधर्माचे संरक्षण करणे व त्यासाठी बलोपासना आवश्यक असल्याचे पटवून समर्थ

रामदास स्वामींनी हिंदुधर्म, जो पूर्वी 'सहिष्णु' होता तो पूर्ण 'अहिष्णु' केला. 'सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे।' 'मतामतांचा गलबला, धकाधकीचा मामला' हे जे शब्द समर्थांनी दासबोधात योग्य ठिकाणी योग्य अर्थाने वापरले आहेत, त्यावरून ते निश्चितच राजकारणी व राजकारणात शिवाजी महाराजांस मार्गदर्शन करणारे होते, हे आपोआप सिद्ध होते.

दासबोध या ग्रंथाच्या पूर्वार्धात अध्यात्म सांगितले असले तरी उत्तरार्धात राजकारणाची व व्यवहारवादाची शिकवण दिली आहे. परंतु ब्राह्मणाला कोणतेही श्रेय द्यायचे नाही म्हणून ही सर्व तर्कटे रचण्यात येतात.

आज चातुर्वर्ण्याबाबत एक नवेच तर्कट उठवून ब्राह्मणांविरुद्ध वादळ उठविण्यात आले आहे. पण 'चातुर्वर्ण्यं मया सृष्ट्वा' असे भगवंतांनी गीतेत सांगितले. गीता कृष्णाने अर्जुनाला सांगितली. म्हणजे एक क्षत्रिय दुसऱ्या क्षत्रियास 'चातुर्वर्ण्य' सांगतो. त्यात ब्राह्मणाचा संबंध येतोच कुठे? तसेच 'मनुस्मृति' जाळण्यात येते. पण मनुस्मृति सांगणारा 'मनु' नावाचा क्षत्रिय राजा होता हे यांना माहीत आहे काय?

आज मात्र समर्थांना वाईट दिवस आले आहेत असे दिसते. कोणी त्यांना हेर म्हणतो, कोणी त्यांना पत्नीत्यागी म्हणतो. कोणी काय आणि कोणी काय. परंतु हे सर्व वेडेचार आमचे सरकार कसे काय चालू देते याचे मला आश्चर्य वाटते. सध्या जितके लिखाण लिहिले जाते तितके पूर्वी कधीही लिहिले गेले नसेल आणि सरकार याबाबत डोळेझाक करते.

चित्पावन ब्राह्मण समाजाविषयी इतके घाणेरडे लिहिले गेले तरी त्याविरूद्ध एकही आवाज उठला नाही याचे मला आश्चर्य वाटते. या जातीयवादी लिखाणास आळा घालणे सरकारचे कर्तव्य आहे. पण सरकार कर्तव्यच्युत झाले आहे.

समर्थ रामदास स्वामी तुळजापुरास भवानी मातेच्या दर्शनास गेले असता त्यांनी स्पष्ट प्रार्थना केली की, 'तुझा तू वाढवी राजा, शीघ्र आम्हाशी देखता'. येथे राजा हा शब्द शिवाजी महाराज यांनाच उद्देशून असावा. हे फाटक म्हणतात की, रामदासांचे थोरले भाऊ, त्यांच्या मुलाचे नाव राजाराम होते. त्याला उद्देशून रामदासांनी ही प्रार्थना केली. आहे की नाही तिरकस डोकें. हा त्यांचा स्पष्ट व दुष्ट उद्देश या त्यांच्या सर्व खटाटोपामागे आहे हे उघड आहे.

शिवाजीराज्याभिषेक मात्र गागाभट्टांनी मुद्दाम घडवून आणला ही सत्य परिस्थिती आहे. परंतु या राज्याभिषेकाला समर्थ का हजर राहिले नाहीत असा आक्षेप घेण्यात येतो. त्या आक्षेपाचे निराकरण असे, की बैराग्याने राज्याभिषेकास हजर रहावयाचे नसते असा संकेत आहे. समर्थ बैरागी होते म्हणून ते हजर राहिलेले नाहीत आणि दुसरे असे, की शिवाजी महाराजांनी आपले सर्व राज्य त्यांच्याच झोळीत टाकले होते. तेव्हा त्याच राजाच्या अभिषेक प्रसंगी त्यांनी उपस्थित राहणे उचित नव्हते म्हणून समर्थ राज्याभिषेकास हजर नव्हते.

समर्थ रामदास व वारकरी पंथात वैर नव्हते तर त्यांनी समन्वयच घडवून आणला. ते पंढरीस पांडुरंगाच्या दर्शनास गेले तेव्हा त्यांना विठ्ठलाच्या जागी रामच दिसला व त्यांनी 'रामा, तुझे धनुष्यबाण व वानरसैन्य कुठे आहे?' असे विचारले व आता, दुष्टांच्या निर्दालनासाठी पुन्हा धनुष्य हाती घ्या अशी पंढरीच्या विठ्ठलाला प्रार्थना केली आहे.

समर्थांसारखा मोठा चतुरस्त्र राजकारणी व थोर राष्ट्रगुरु महाराष्ट्रात होऊन गेला. परधर्मापासून या देशाचे संरक्षण करण्यासाठी सज्ज व्हावे म्हणून समर्थांनी संघटना निर्माण केली. अशी संघटना निर्माण करणारे ते एकमेव संत होते. छत्रपती शिवाजी

महाराजांच्या स्वराज्यकल्पनेला त्यांनी स्वधर्मांची जोड दिली. व्यक्ती आणि परमार्थ यांमध्ये समाजपुरुष उभा आहे म्हणून समर्थ समाजोन्मुख झाले, असे महत्कार्य समर्थांनी केले असता त्यांना नगण्य ठरविणाऱ्या न.र. फाटकाला काय म्हणावे? असो. परमेश्वर त्यांना सद्गती देवो. 'जय जय रघुवीर समर्थ'.

सौजन्य : सज्जनगड मासिक, डिसेंबर २००९ चा अंक